# कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांचे कार्यालय

पहिला माळा, नविन प्रशासकिय इमारत (वन भवन), शासकिय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२ - २५६०७२७ Email ID: edpenchfoundation@mahaforest.gov.in
संकेत स्थळ: - www.penchtigerreserve.maharashtra.gov.in सफारी बुकिंग :- www.safaribooking.mahaforest.gov.in


**क्रमांक**:- पेटाकंफा/प्रक्र.163/259 /25-26 नागपूर,440001, दिनांक 08/10/2025

**विषय**:- पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर महाराष्ट्र पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

उपरोक्त विषयांकित प्रकरणी पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) बाबत जाहिरात ही स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करण्यात करीता पाठविण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता प्रकाशित करण्याकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदरहु माहिती त्वरीत http://www.mahaforest.gov.in and www.penchtigerreserve.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (Upload) प्रकाशित करण्यात यावी.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे.

(श्रीलक्ष्मी ए)
कार्यकारी संचालक
पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर

**प्रति,**

श्री. योगेश काळे, NIC Programmer,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पुर्व, नागपूर

# कार्यकारी संचालक
# पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,नागपूर, महाराष्ट्र

## पदभरती (कंत्राटी पध्दतीवर)

कार्यकारी संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर कार्यालया अंतर्गत 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर **Law Officer (कायदा अधिकारी), Eco-tourism Manager (निसर्ग पर्यटन व्यवस्थापक), Data EntryOperator (डाटा एन्ट्री ऑपरेटर)** असे एकूण 3 पदाची नेमणुक करावयाची आहे. अधिकची माहिती http://www.mahaforest.gov.in / www.penchtigerreserve.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून तसेच पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान नागपूर या कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वरून प्राप्त करता येईल. या कार्यालयात प्रत्यक्ष सादर केलेल्या व ई-मेलव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाईल,याची कृपया नोंद घ्यावी. प्रत्यक्ष / ई-मेलव्दारे अर्ज दिनांक 17/10/2025 रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेला अर्जाचा विचार केला जाणार नाही.

प्राथमिक छाननीनंतर पात्र उमेदवारांना (Shortlist Candidates) मुलाखतीची तारीख, वेळ व स्थळ दूरध्वनी/ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. तसेच मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर/संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

अर्ज करण्याकरीता खालील ई-मेलचा वापर करावा.

edpenchfoundation@mahaforest.gov.in

**(सोनल एस. कामडी)**
विभागीय वन अधिकारी
कार्यकारी संचालक
पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर

**मुळप्रत मु.व.स. तथा क्षे.सं.**
**पेंच व्याघ्र प्रकल्प, यांचेकडून अनुमोदित**

# जाहिरात दिलेल्या पदांची शैक्षणीक व अतिरिक्त पात्रता

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण पद | मानधन | मुख्यालय | आवश्यक शैक्षणीक पात्रता | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Law Officer (कायदा अधिकारी) | ०१ | ५०,०००/- | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपूर यांचे कार्यालय | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्याची पदवी तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाने घेतलेली अखिल भारतीय बार परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यांनी अॅडव्होकेट्स अॅक्टनुसार राज्य बार कौन्सिलमध्ये वकिल म्हणून नोंदणी केलेली पाहिजे. शैक्षणिक अर्हता व अनुभव<br>१. मान्यता प्राप्त विद्यापीठातून कायद्याचा पदवीधर व सनदधारक.<br>२. जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश, सेवानिवृत्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी किंवा विधी व न्याय विभागामधुन सेवानिवृत्त झालेले सहसचिव/उपसचिव/अवर सचिव या दर्जाचे अधिकारी या शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेले असावा.<br>३. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याचे दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी. | नागपूर प्रादेशिक वनवृत्तांर्गत नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया या वनविभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)-पुर्व, नागपूर व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व वन्यजीव विभागातील आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा., नागपूर कार्यालयातील जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी. वनविभागाचे न्यायालयीन प्रकरण हाताळण्याचे किमान २ वर्षाचा अनुभव. |
| २ | निसर्ग पर्यटन व्यवस्थापक (Eco-tourism Manager) | ०१ | २०,०००/- | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपूर यांचे कार्यालय | कोणत्याही शाखेत पदवी / एमबीए / हॉस्पिटॅलिटी आणि हॉटेल मॅनेजमेंट / पर्यटन व्यवस्थापन यात पदविका असल्यास प्राधान्य<br>इंग्रजी हिन्दी व मराठी भाषा सहजतेने वाचता लिहता व बोलण्यास सक्षम असावा. | वनविभागात काम केलेले असल्याचा किमान १ वर्षाचा अनुभव. |
| ३ | Data Entry Operator (डाटा एन्ट्री ऑपरेटर) | ०१ | १५,०००/- | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपूर यांचे कार्यालय | कोणत्याही शाखेतील पदवीधर, तसेच MS-CIT परीक्षेत उर्त्तीर्ण, टंकलेखन वेग इंग्रजी -४० शप्रमी, मराठी -४० शप्रमी. | किमान 2-3 वर्षाचा अनुभव तसेच मुलभुत संगणक ऑपरेटिंग सिस्टिमचे ज्ञान असने आवश्यक आहे, इंटरनेट आणि ई-मेलवरही काम करता आले पाहिजे. तसेच MS-Office, MS-Word, MS-Excel व Power Point इ. चे चांगले ज्ञान असावे. |

टिप:-

1) या पदाकरीता मराठी व इंग्रजीचे पुरेसे ज्ञान (वाचता,लिहीणे, बोलणे) अत्यावश्यक आहे.
2) निवड झालेल्या उमेदवारास वरील तक्त्यात दर्शविलेल्या मुख्यालय ठिकाणी काम करावे लागेल.
3) पेंच व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर पदभरती (कंत्राटी पध्दतीवर) सदर पदाकरीता बायोडाटा (Resume) व अर्ज (Application) तसेच वरील प्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता बाबतचे मुळ दस्ताऐवज मुलाखतीच्या वेळेस दाखविण्यात यावे.
4) उमेदवार हा कोणत्याही इतर शासकीय, निमशासकीय, अशासकीय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकारी असता कामा नये.
5) सदर पदे ही पुर्णवेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/प्रॅक्टीस करता येणार नाही.
6) नियुक्ती झालेल्या कंत्राटी पदास 24 तास सेवेकरीता तत्पर राहणे बंधनकारक राहील. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे आदेशान्वये पेंच व्याघ्र प्रकल्प कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी कार्य करावे लागेल.
7) नियुक्त प्राधिकारी समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहिल यांची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(श्रीलक्ष्मी.ए)
कार्यकारी संचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, नागपुर